# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.07.2026** **वार:रविवार**

1. सरकारशी सकारात्मक चर्चेनंतर सीजेपीचं आंदोलन मागे
2. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा; केंद्रीय मंत्री प्रह्लाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रीपदाचा कार्यभार
3. सार्वजनिक परीक्षेतील गैरव्यवहार रोखण्यासाठीचं सुधारणा विधेयक उद्या लोकसभेत सादर केलं जाणार
4. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीवरून करणार मन की बात
5. कारगिल विजय दिवसानिमित्त देशभरात आज विविध कार्यक्रमाचं आयोजन
6. जागतिक युवा स्क्वॅश अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या अनाहत सिंगचा ऐतिहासिक विजय आणि
7. आशियाई युवा हॉकी फाइवज् अजिंक्यपद स्पर्धेत पाकिस्तानवर मात करत भारताची विजयी कामगिरी

**<u>आंदोलन मागे</u>**

सरकारशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर सीजेपीनं आपलं आंदोलन मागे घेतलं आहे. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांनी काल सीजेपीच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. आंदोलकांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही आणि त्यांच्याविरुद्ध कोणताही एफआयआर दाखल केला जाणार नाही, असं नड्डा यांनी सीजेपीच्या शिष्टमंडळासमवेत नवी दिल्लीत घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितलं. NEET UG ची प्रश्नपत्रिका फुटल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्याच्या मुद्द्यावरही नियमानुसार जास्तीत जास्त मदत देण्यासाठी सरकार तयार असल्याचं नड्डा यांनी सांगितलं. सीजेपीचे राष्ट्रीय प्रवक्ते आशुतोष रांका यांनी सर्व आंदोलकांना त्वरित आंदोलन मागं घेण्याचं आणि शांततेने आपापल्या घरी परतण्याचं आवाहन केलं.

**<u>धर्मेंद्र प्रधान-राजीनामा</u>**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आपला राजीनामा सुपूर्द केला. विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे आपल्याला दुःख झालं असून, हा आपल्यासाठी प्रतिष्ठेचा प्रश्न नाही, असं प्रधान यांनी समाज माध्यमावरील त्यांच्या संदेशात म्हटलं आहे. तरुण हेच या देशाची खरी ताकद आहेत आणि त्या ताकदीला कुणी संभ्रमित करू नये, हा आपला उद्देश असल्याचं प्रधान यांनी म्हटलं आहे. जंतर मंतरवरच्या आंदोलनाचा फायदा देशविरोधी घटकांनी घेऊ नये तसंच विद्यार्थ्यांनी आपला वेळ आणि ताकद आपली कारकिर्द घडवण्यासाठी लावावी या उद्देशाने पंतप्रधानांकडे राजीनामा सुपूर्द करत असल्याचं प्रधान यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा केंद्रीय मंत्रिपरिषदेचा राजीनामा स्वीकारला आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडं शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. प्रल्हाद जोशी सध्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण तसंच नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री म्हणून काम पाहत आहेत.

**<u>परीक्षा विधेयक</u>**

सरकार उद्या लोकसभेत सार्वजनिक परीक्षा अयोग्य मार्गांचा प्रतिबंध सुधारणा विधेयक 2026 सादर करणार आहे. सोमवारच्या कामकाजाच्या यादीत या विधेयकाचा समावेश करण्यात आला आहे. सार्वजनिक परीक्षांमधील अयोग्य कृती किंवा गैरव्यवहार रोखण्यासाठी 2024 मध्ये केलेल्या कायद्यात सुधारणा करण्याच्या उद्देशाने हे विधेयक आणलं जात आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह हे विधेयक सादर करतील. प्रश्नपत्रिका फुटणं आणि परीक्षांमधील गैरप्रकार यांसारख्या प्रकरणांच्या सुनावणीसाठी जलदगती न्यायालयं स्थापन करण्यास तसंच या प्रकरणातील दोषीना कठोर शिक्षेची तरतूद करण्याच्या विधेयकच्या मसुद्याला केंद्रीय मंत्रिमंडळानं शुक्रवारी मंजुरी दिली आहे.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी अकरा वाजता आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमाद्वारे देश-परदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा 136 वा भाग असेल. आकाशवाणी, दूरदर्शन नेटवर्क, ए.आय.आर. न्यूज वेबसाइट आणि न्यूज ऑन ए. आय. आर. मोबाइल ॲपवर देखील हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. हिंदीतल्या प्रसारणानंतरहा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्येही प्रसारित केला जाईल.

**विकसित व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम**

विकसित व्हायब्रंट व्हिलेज उपक्रमामधील सहभागीशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी दूरस्थ प्रणालीद्वारे संवाद साधणार आहेत. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचं प्रतिनिधित्व करणारे 400 हून अधिक तरुण यामध्ये सहभागी होणार आहेत. 4 ते 30 जून दरम्यान दोन टप्प्यांत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील 74 गावांचा समावेश होता.

**कारगिल विजय दिवस**

27 वा कारगिल विजय दिवस आज देशभरात साजरा होत आहे. या निमित्त काल द्रास इथं कारगिल युद्ध स्मारकावर 'शौर्य संध्या' हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह संरक्षण दलांचे आणि प्रशासनाचे अधिकारी, माजी सैनिक, 'वीर पत्नी', हुतात्मा जवानांचे कुटुंबीय या कार्यक्रमाला उपस्थित होते. आज कारगिल युद्ध स्मारकावर हुतात्मा जवानांना श्रद्धांजली अर्पण केली जाणार आहे.

**संरक्षणमंत्री**

कारगिल विजय दिनानिमित्त, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी देशरक्षणासाठी आपल्या प्राणांचं बलिदान देणाऱ्या शूर सैनिकांना श्रद्धांजली वाहिली आहे. 1999 मध्ये कारगिलच्या शिखरांवर असाधारण शौर्य गाजवणाऱ्या वीर सैनिकांबद्दल देश सदैव कृतज्ञ राहील. त्यांचं अदम्य धैर्य, सर्वोच्च बलिदान, कर्तव्यनिष्ठा भावी पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील, असं राजनाथ सिंह यांनी समाज माध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे.

**राष्ट्रपती**

तीन देशांचा दौरा आटोपून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सकाळी माय देशी परतल्या आहेत. मोल्दोव्हा, उत्तर मॅसेडोनिया आणि रोमानिया या तीन युरोपीय देशांच्या दौऱ्यात राष्ट्रपतींनी भारताची धोरणात्मक भागीदारी मजबूत करणं आणि परस्पर हितसंबंधांच्या क्षेत्रात सहकार्य वाढवणं या उद्देशानं उच्चस्तरीय बैठक घेतली. तसंच भारतीय समुदायाशी संवाद साधला.

**पाकिस्तान**

पाकव्याप्त जम्मू-काश्मीर भागात सुरू असलेली निदर्शनं आता अधिक तीव्र झाली आहेत. 'जम्मू-काश्मीर जॉइंट आवामी ॲक्शन कमिटी'नं आजपासून दोन दिवसांच्या आंदोलनाचा इशारा दिला असून, याची सांगता मुझफ्फराबादकडे काढल्या जाणाऱ्या पदयात्रेनं होणार आहे. मानवाधिकार कार्यकर्ते उमर नझीर काश्मिरी आणि ॲडव्होकेट ख्वाजा मेहरान यांनी दाद्यालमध्ये 'संपूर्ण बंद'ची हाक दिली आहे, आणि मीरपूर विभागातील नागरिकांना या आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. वाढती महागाई, विजेचे चढे दर आणि मानवी हक्कांवरील निर्बंधांमुळं लोकांमध्ये संतापाची भावना वाढत असल्यानं हे आंदोलन तीव्र झालं आहे.

**इफफी**

57वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव म्हणजेच इफफी येत्या 20 ते 28 नोव्हेंबर या कालावधीत गोव्यात होणार आहे. राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळानं यासाठीच्या प्रवेशिका स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. भारतीय गटातील प्रवेशिका सादर करण्याची मुदत ऑगस्टच्या मध्यापर्यंत आहे, तर आंतरराष्ट्रीय प्रवेशिका सादर करण्याची अंतिम मुदत 31 ऑगस्ट आहे.

**नथुला-कैलास मानसरोवर यात्रा**

सिक्कीममध्ये, नथुला मार्गावरून कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेली पाचवी तुकडी कैलास पर्वत आणि मानसरोवराची पवित्र यात्रा यशस्वीपणे पूर्ण करून गंगटोकला सुरक्षित परतली आहे. त्यानिमित्त, सिक्कीम पर्यटन विकास महामंडळानं काल गंगटोक इथं एका

सत्कार समारंभाचं आयोजन केलं होतं. यात्रेकरूंनी त्यांचे आध्यात्मिक अनुभव सांगितले आणि ही पवित्र यात्रा यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल असीम समाधान व्यक्त केले. यावर्षी नथुला मार्गावरून कैलास मानसरोवर यात्रेसाठी 10 तुकड्यां जाणार आहेत.

## क्रिकेट

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, हरारे इथं झालेल्या दुसऱ्या टी-20 क्रिकेट सामन्यात भारतानं झिम्बाब्वेचा 90 धावांनी पराभव करून तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित 20 षटकांत 5 बाद 219 धावा केल्या. इशान किशननं 44 चेंडूंत 81 धावां तर तिलक वर्मानं 29 चेंडूंत नाबाद 60 धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या आव्हानाचा पाठलाग करताना, झिम्बाब्वेचा संघ 18व्या षटकापर्यंत 129 धावांच करू शकला. भारताकडून अभिषेक शर्मानं 3 तर पदार्पण करणाऱ्या यश ठाकूर आणि प्रिन्स यादव यांनी प्रत्येकी 2 बळी मिळवले. भारतीय टी-20 संघाचा नवीन कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील हा पहिलाच मालिका विजय आहे.

## स्क्वॅश

'जागतिक युवा स्क्वॅश अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या एकेरीमध्ये भारताच्या अनाहत सिंगनं ऐतिहासिक विजेतेपद पटकावलं आहे. कॅनडात नायगारा-ऑन-द-लेक इथं झालेल्या अंतिम सामन्यात, अव्वल मानांकित अनाहत सिंग हीनं इजिप्तच्या रुकय्या सालेमचा 3-0 असा पराभव केला. या स्पर्धेचं विजेतेपद पटकावणारी अनाहत ही पहिली भारताची खेळाडू ठरली आहे. 18 वर्षीय अनाहतनं दुसऱ्या मानांकित सालेमचा 11-3, 11-7, 11-9 असा पराभव करून सुवर्णपदक जिंकलं. इजिप्तच्या खेळाडूंची गेल्या 16 वर्षांची मक्तेदारी मोडत एकही गेम न गमावता अनाहतनं हा ऐतिहासिक विजय मिळवला.

## हॉकी

ओमानमध्ये पार पडलेल्या युवा हॉकी फाइवज् आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकाच्या सामन्यात, भारतीय युवा संघानं प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा 3-1 असा पराभव करत विजेतेपदाला गवसणी घातली आहे. रोमित पाल, कर्णधार केतन कुशवाह आणि शाहरुख अली यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला.

महिलांच्या स्पर्धेत, चीनविरुद्धच्या अटीतटीच्या अंतिम सामन्यानंतर भारतीय संघानं रौप्यपदक जिंकलं; दोन्ही संघांच्या या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करत, 'हॉकी इंडिया'नं खेळाडूंना बक्षीस जाहीर केलं आहे. पुरुष संघातील प्रत्येक खेळाडूला 2 लाख रुपये, आणि रौप्यपदक जिंकणाऱ्या भारतीय महिला संघातील प्रत्येक खेळाडूला 1 लाख रुपये बक्षीस दिलं जाईल.

## हवामान

भारतीय हवामान विभागानं आज मध्य महाराष्ट्र आणि ओडिशामध्ये अति मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसंच उद्यापर्यंत छत्तीसगड, गुजरात आणि गोवा या भागांत मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज आहे. आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल आणि हिमाचल प्रदेशमध्येही आज मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.